कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/७०० /२०२६ दि. २८/०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोपरी वाहतूक उपविभागाचे हद्दीत इर्स्टन एक्सप्रेस हायवेवर आनंद नगर, कोपरी ते साकेत असे एलिव्हेटेड ब्रिजचे काम चालु आहे. सदर कामाचे अनुषंगाने गुरुव्दारा सर्व्हीस रोड येथे पिलर टाकण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** कोपरी सर्कल कडुन भास्कर कट मार्गे गुरुव्दाराकडे सर्व्हीस रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भास्कर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने भास्कर कट येथुन डावे वळण घेवुन ज्ञानसाधना कॉलेज रोडने तीनहात जंक्शन मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** गोखले रोड, टेलीफोन नाका व बी केबीन कडुन भास्कर कट मार्गे गुरुव्दाराकडे सर्व्हीस रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भास्कर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने भास्कर कट येथुन डावे वळण घेवुन ज्ञानसाधना कॉलेज रोडने तीनहात जंक्शन मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि.२९/०४/२०२६ रोजी पासून काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे / नवी मुंबई / बृन्मुबई / मिरा भाईंदर महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२ / – सदर अधिसूचना नागरीकान्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२ / – सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.